# खालील पदांसाठी घेण्यात येणा-या संयुक्त चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम

१. प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (प्रशासन शाखा-लिपिक संवर्ग)
२. सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, वितरण अधिकारी आणि समन्वय अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट - ब
३. उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक)
४. प्रबंधक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (अतांत्रिक)
५. प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षण सेवा, गट - ब
६. वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट- अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (चालू रिक्त पदे)
७. वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (अनुशेषाची पदे)
८. अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (चालू रिक्त पदे)
९. अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा)(अनुशेषाची पदे)
१०. तालुका क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट - ब
११. जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट - अ
१२. सहायक प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-ब

---

**दर्जा : पदवी, गुण : २००, माध्यम : इंग्रजी व मराठी, कालावधी : दोन तास, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी**

**विषय - सामान्य ज्ञान, बुध्दिमापन चाचणी - या विषयामध्ये खालील घटकांचा समावेश असेल** :-

(१) **चालू घडामोडी (३० गुण)** :- जागतिक तसेच भारतातील.

(२) **बुध्दिमत्ता चाचणी (४० गुण)** :- अंकगणित, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सरासरी, दशांश व अपूर्णांक, तसेच बुध्दयांक मापनाशी संबंधीत प्रश्न.

(३) **महाराष्ट्राचा भूगोल(३० गुण)**:- महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical)भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न.

(४) **माहितीचा अधिकार कायदा - २००५ (१० गुण)**

(५) **महाराष्ट्राचा इतिहास (१५ गुण)** :- सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी (सत्यशोधक समाज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय क्रांती चळवळ, डावी विचारसरणी / कम्युनिष्ट चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासींचा उठाव.)

(६) **भारतीय राज्यघटना (२५ गुण)** :- घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या.

(७) **संगणक व माहिती तंत्रज्ञान (२५ गुण)** :- आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलोजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य.

(८) **मानवी हक्क व जबाबदाऱ्या (२५ गुण)** :- संकल्पना – आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षता, बेकारी, सामाजिक- सांस्कृतिक-धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

********